# मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर वनवृत्त नागपुर यांचे कार्यालय.

बीएसएनएल संचार लक्ष्मी भवन, कस्तूरचंद पार्क, नागपूर-४४० ००१

फोन नं.०७१२-२५६४५६९, E-mail:-ccftnagpur@mahaforest.gov.in

महाराष्ट्र वन विभाग


क्रमांक- कक्ष-५/दक्षता/प्र.क्र.१०/२०२२-२३/ 5763 नागपुर, दिनांक 28/03/2023

महत्वाचे / ई-मेलव्दारे/आदेश

**मालकी प्रकरण हाताळतांना अनियमतता**

विषय- महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (विनियमन) अधिनियम १९६४ अंतर्गत वृक्ष अधिकारी यांचेमार्फत क्षेत्रीय पातळीवर वारंवार होत असलेली अनियमतेमुळे क्षेत्रीय अडचणी विचारात घेवून मुळ शासन परिपत्रके व महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील तरतूदी मध्ये सुधारणा सुचविणे करिता अभ्यासगट

संदर्भ-
१) या कार्यालयाचे जावक क्रमांक कक्ष-५/दक्षता/११६५ दिनांक २७/१०/२०२२
२) वनपरिक्षेत्र अधिकारी (फिरते पथक) सर्व यांची दिनांक २१/१०/२०२२ ची सभा
३) वनपरिक्षेत्र अधिकारी (फिरते पथक) सर्व यांची दिनांक २१/०१/२०२२ ची सभा
४) या कार्यालयाचे जावक क्रमांक कक्ष-५/दक्षता/४९८३ दिनांक ३०/०१/२०२३
५) मानवाधिकार सहायक संघ, जि.वर्धा यांचे दिनांक १३/०२/२०२३ चे निवदेन
६) फारेस्ट रेंजर्स असोसिएशन महाराष्ट्र यांचे दिनांक १६/०२/२०२३ चे निवेदन
७) श्री.संजय केशरवानी, अध्यक्ष, विदर्भ खाजगी जंगल ठेकेदार व कास्तकार संघटना नागपूर यांचेशी दिनांक ०४/०३/२०२३ व २८/०३/२०२३ रोजी झालेली चर्चा
८) उपवनसंरक्षक (प्रादेशिक) सर्व यांची दिनांक ०४/०३/२०२३ ची आढावा बैठक

विषयांकित प्रकरणाचे अनुषंगाने नागपूर वनवृत्तातील प्रकरणांचा आढावा घेतला असता असे निदर्शनास आले आहे की, अलिकडील काळात मालकी प्रकरणात अनियमितता होणे व त्याबाबच्या तक्रारी या कार्यालयात प्राप्त होण्याचे प्रमाण वाढले आहेत. त्याच बरोबर नागपूर वनवृत्तात लाच लुचपत प्रतिबंधक कायदा अंतर्गत करण्यात आलेल्या कार्यवाहीचे प्रमाण मालकी प्रकरणात जास्त दिसून येते. मालकी प्रकरणातील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यवाहीमूळे संबंधीत कर्मचारी / अधिकाऱ्यांचे चारित्र्यावर शितोंडे उडतात, समाजातील स्थानास धक्का पोहचतो. त्याच बरोबर क्षेत्रीय कर्मचाऱ्यांचे सेवाविषयक बाबी उदाहरणार्थ पदोन्नती, वेतन वाढ, पेन्शन, आश्वासीत प्रगती योजनेचे लाभ इत्यादी बाबींवर परिणाम होतो, त्यासाठी अनेक लोक प्रतिनिधी सूचना करीत असतात. कारण असे खटले अनेक वर्षे चालतात पर्यायाने वनविभागाची प्रतिमा सुध्दा मलीन होत असते, अशावेळी मालकी प्रकरणे हाताळतांना क्षेत्रीय पातळीवर येणाऱ्या अडचणींचे कायमस्वरुपी निराकरण झाले व वेळीच त्रुट्या दुरुस्त झाल्यास मालकी प्रकरणात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई टाळता येईल.

१.०० वनपरिक्षेत्र अधिकारी (फिरते पथक) यांना खालील स्वाक्षरीकर्ते यांचे कार्यक्षेत्रातील मालकी प्रकरणे तपासून सविस्तर अहवाल सादर करणेकरिता या कार्यालयाचे वरील संदर्भ १ नूसार निर्देशित करण्यात आले आहे. तथापि भंडारा वनविभाग अंतर्गत प्रादेशिक वनपरिक्षेत्रात कार्यरत वन परिक्षेत्र अधिकारी हे मालकी प्रकरणातील वृक्षतोड कटाई आदेश प्रपत्र-६ व त्यासोबत आवश्यक सहपत्रांच्या प्रती वेळीच वन परिक्षेत्र अधिकारी फिरते पथक यांना पुरवठा करीत नसल्याची बाब या कार्यालयाचे निदर्शनास आली आहे. शासकीय कामात वेळीच सहकार्य करुन, विहीत कालावधीत कामे पूर्ण करणे हे शासकीय अधिकाऱ्यांचे कर्तव्य आहे. यावरुन आपण

वरिष्ठ कार्यालयाचे निर्देशांची पालन न करता जाणीवपूर्वक अवहेलना करीत असल्याचे स्पष्ट होते.

२.०० खालीलस्वाक्षरीकर्ते यांनी माहे जानेवारी २०२३ मध्ये प्राप्त माहितीचे आधारे नागपूर, वर्धा व भंडारा वनविभागातील काही मालकी प्रकरणांची प्रत्यक्ष मौका तपासणी केली असता व स्वत: खात्री केली असता त्यामध्ये प्रथमदर्शनी निदर्शनास आलेली अनियमितता पूढील प्रमाणे-

- प्रादेशिक वन परिक्षेत्राचे वन परिक्षेत्र अधिकारी तसेच त्यांचे अधिनस्थ क्षेत्रीय कर्मचारी प्रत्यक्ष मौकास्थळी जावून मौका पाहणी करीत नाहीत.
- मालकी प्रकरणातील आवश्यक सर्व कामे संबधीत कंत्राटदारच करीत असल्याचे क्षेत्रीय कर्मचाऱ्यांशी तसेच शेतकऱ्यांशी व त्यांचे प्रतिनिधींशी प्रत्यक्ष चर्चा केल्यावर निदर्शनास आले.
- त्यामूळे सर्रासपणे शासकीय जमीनी, महसूल, गावठाण, जलसंपदा, जिल्हा परिषद, इत्यादी तसेच पांधन रस्ता तसेच नदी नाल्यांच्या काठावरील लगतच्या कास्तकारांचे हद्दीतील झाडे अवैधरित्या तोड केली असल्याचे आढळते.
- सात-बारातील नोंदीप्रमाणे मुळ मालकाच्या संमतीविना कंत्राटदारामार्फत झाडे कटाई होत असल्याचे आढळून आले असून, सातबारामधील नोंदीप्रमाणे इतर मालकांच्या संमतीपत्रावर कंत्राटदारामार्फतच सह्या करुन संमतीपत्र वन परिक्षेत्र अधिकारी यांचे सादर केल्याचे आढळते.
- शेतमालकाचे वतीने मालकी प्रकरण सादर करणारे कंत्राटदार यांचेवर विश्वास ठेवून वन परिक्षेत्र अधिकारी हे कोणतीही शहानिशा न करता वृक्षतोड परवानगी आदेश जारी केल्याचे आढळते.
- परिक्षेत्रातील वनसंरक्षण तसेच इतर विकास कामांचे व्यस्ततेमूळे वनविभागाचे क्षेत्राव्यतिरिक्त इतर क्षेत्रातील अवैध वृक्षतोडीवर क्षेत्रीय अधिकारी / कर्मचारी यांचे कोणतेही नियंत्रण नाही.
- क्षेत्रीय कर्मचारी यांचेकडून नियमाप्रमाणे कार्यवाही होत नसल्याने जंगलातील किंवा शासकीय जमीनीवरील वृक्षांची तोड होवून परवानगी दिलेल्या मालात मिसळण्यात येतात. त्यामूळे संबधित शेतकऱ्यांवर देखील अनेक गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत, हे अतिशय गंभीर आहे, कारण काही शेतकऱ्यांनी तशी तक्रार शासनाकडे दाखल केलेली आहे.

३.०० खालीलस्वाक्षरीकर्ते यांचे असेही निदर्शनास येते की,

- ➢ नागपूर वनवृत्तातील अनेक विभागीय चौकशी प्रकरणाचा देखील आढावा घेतला असता, किमान ७० ते ८० टक्के प्रकरणे ही मालकी खसरा बाबीशी संबधित असून, सर्व प्रकरणात लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेमार्फत कार्यवाही झाली असल्याचे निदर्शनास येते.
- ➢ तथापि मालकी प्रकरणे निष्काळजीपणे हाताळल्याने शासकीय जमीनीवरील अवैध वृक्षतोड होत असल्याची बाब सुकृतदर्शनी निदर्शनास येते.
- ➢ काही प्रकरणे तर लोकायुक्त कार्यालय तसेच उच्च न्यायालयात देखील दाखल झालेली आहेत. ही बाब अतिशय गंभीर आहे.

- ➢ पर्यायाने परिक्षेत्र पातळीवर होत असलेल्या अनियमिततेमूळे मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) किंवा उपवनसंरक्षक (प्रादेशिक) यांना प्रत्येक प्रकरणात स्वत: उपस्थित रहावे लागते व विभागाची प्रतिष्ठा व प्रतिमा याचा विचार करुन प्रत्येक प्रकरणावर पांघरुन घालावे लागते व सकारात्मक बाजूच मांडावी लागते.
- ➢ वन व वनसंपत्तीचे संरक्षण करणे वन परिक्षेत्र अधिकारी यांचे आद्य कर्तव्य आहे. परंतू आद्य कर्तव्यातच आपण दिरंगाई करीत असल्याची बाब प्रथम दर्शनी निदर्शनास येते.
- ➢ तथापि दिनांक २१/०१/२०२३ रोजी फिरते पथक वन परिक्षेत्र अधिकारी यांचे सभेत आढावा घेतला असता, मालकी प्रकरणाचे कटाई आदेशाची प्रतच विहित वेळेत फिरते पथकास प्राप्त होत नसल्याचे निदर्शनास आलेले आहे. यावरुन आपण वरिष्ठ कार्यालयाचे आदेशाची अवहेलना करीत असल्याचे आढळते.
- ➢ वरिष्ठ कार्यालयाचे आदेश / निर्देश / सूचनांची अवहेलना करणे ही बाब अत्यंत गंभीर स्वरुपाची असून, शासकीय शिस्तीचा भंग ठरतो.
- ➢ मालकी प्रकरणातील वरील अनियमिततेकरिता वनपरिक्षेत्र पातळीवरील विविध शासकीय कामांचा प्रचंड व्याप आणि त्याअनुषंगाने कमी पडणारा कामाचे नियोजनाचा अभाव असण्याची शक्यता नाकारता येत नाही.
- ➢ याअनुषंगाने आवश्यक सर्व बाबी लक्षात घेता, काही अमुलाग्र बदल करणे आवश्यक आहे अशा निष्कर्षापर्यन्त खालीलस्वाक्षरीकर्ते आलेले आहे, त्यात लोकांचे कल्याणाचे व विशेषत: शेतकऱ्यांचे हिताचे दृष्टीने व जनहिताचे दृष्टीने काही धोरणात्मक सुधारणा वरिष्ठांमार्फत शासनास कळविण्याचा या कार्यालयाचे पातळीवर गांभीर्याने विचार करण्यात येत आहे.

४.०० याअनुषंगाने मानवाधिकार सहायक संघ, जि.वर्धा यांचे दिनांक १३/०२/२०२३ चे निवदेन, फारेस्ट रेंजर्स असोसिएशन महाराष्ट्र यांचे दिनांक १६/०२/२०२३ चे निवेदन, श्री.संजय केशरवानी, अध्यक्ष, विदर्भ खाजगी जंगल ठेकेदार व कास्तकार संघटना नागपूर यांचेशी दिनांक ०४/०३/२०२३ व २८/०३/२०२३ रोजी झालेली चर्चा तसेच उपवनसंरक्षक (प्रादेशिक) सर्व यांची दिनांक ०४/०३/२०२३ रोजीचे आढावा बैठकीत आवश्यक सर्व मुद्यांवर चर्चा करण्यात आली. तद्अनुषंगाने खाजगी मालकी प्रकरणात होत असलेली अनियमितता तसेच अवैध वृक्षतोडीवर प्रतिबंधात्मक उपाययोजना, सुधारणा करणे अत्यंत आवश्यक असल्याने, व त्याच बरोबर मालकी प्रकरणे हाताळतांना काही सुधारणा करणे आवश्यक आहे. यामध्ये काही पळवाटा व कमतरता राहू नये व शेतकऱ्यांना परवानगीमध्ये तसेच वाहतूक परवाना मिळण्यामध्ये काही अडचणी येवू नये यासाठी सखोल अभ्यास होणेसाठी वन अधिकारी, शेतकरी व लाकूड ठेकेदार यांचा समावेश असलेला सर्वसमावेशक अभ्यासगट या पत्राव्दारे खालीप्रमाणे गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नांव (सर्वश्री) | पदनाम | समिती पदनाम |
|---|---|---|---|
| १. | कुलराज सिंग | उपवनसंरक्षक, गोंदिया | अध्यक्ष |
| २. | राहूल गवई | उपवनसंरक्षक, भंडारा | सह-अध्यक्ष |
| ३. | पी.जी.कोडापे | विभागीय वन अधिकारी (दक्षता) नागपूर | सदस्य सचिव |
| ४. | प्रज्योत पालवे | सहायक वनसंरक्षक, काटोल | सदस्य |
| ५. | रोशन राठोड | सहायक वनसंरक्षक, साकोली | सदस्य |
| ६. | राजेन्द्र सदगीर | सहायक वनसंरक्षक, गोंदिया | सदस्य |
| ७. | गजानन बोबडे | सहायक वनसंरक्षक, वर्धा | सदस्य |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | राघवेंन्द्र. जी. मून | वन परिक्षेत्र अधिकारी, तिरोडा | सदस्य |
| ९. | नितीन जाधव | वन परिक्षेत्र अधिकारी, आर्वी | सदस्य |
| १०. | डी.एस.बागडे | वन परिक्षेत्र अधिकारी, काटोल | सदस्य |
| ११. | रविकमल भगत | वन परिक्षेत्र अधिकारी, फिरते पथक गोंदिया | सदस्य |
| १२. | विवेक राजूरकर | वन परिक्षेत्र अधिकारी, भंडारा | सदस्य |
| १३. | संजय केशरवानी, प्लॉट नं.१६९, प्रेमनगर, इतवारी नागपूर | लाकूड व्यापारी तथा अध्यक्ष, विदर्भ खाजगी जंगल ठेकेदार संघटना, नागपूर प्रतिनिधी | सदस्य |
| १४. | मुजीब शेख, रा.महादेवपूरा, वर्धा | शेतकरी कास्तकार, प्रतिनिधी | सदस्य |
| १५. | संजय बाडबुधे, मु.पो.नाकाडोंगरी, जि.भंडारा, ह.मु.नागपूर | लाकूड व्यापारी प्रतिनिधी | सदस्य |
| १६. | श्री प्रकाश बळीराम चन्ने, रा.रेलटोली, गोंदिया | शेतकरी कास्तकार, निधी | सदस्य |

मार्च महिना आर्थीक वर्षाअखेर व क्षेत्रीय कामे विहित वेळेत पूर्ण करण्याचे बंधन यामूळे या समितीस सखोल अभ्यास करुन सविस्तर धोरणात्मक व सुधारणात्मक बाबी प्रस्तावीत करण्यांस थोडा कालावधी लागणार आहे. तरी समितीने आपला अहवाल एक महिन्याचे कालावधीत जास्तीत जास्त **२८ एप्रिल २०२३** पर्यन्त याकार्यालयास सादर करावा. अहवाल सादर करण्यापूर्वी समितीने आपले पातळीवर बैठका आयोजीत कराव्यात तसेच काही तज्ञांचे लेखी मत देखील प्राप्त करुन घ्यावे व त्यासर्व बाबी अहवालासोबत सहपत्र म्हणून जोडाव्यात. इतर राज्यांमध्ये काय कार्यपध्दती आहे. तसेच तेथील खाजगी वृक्षतोड अधिनियमात काय तरतूदी आहेत याचाही विचार करावा. मूळ कायद्यातील काही तरतूदी कालबाह्य झाल्या असतील तर त्या निरसीत करण्याकरिता प्रस्तावीत कराव्यात, परतू त्याचे सबळ कारण नमूद करणे आवश्यक आहे. सदर अहवाल प्राप्त होताच त्यावर सर्व उपवनसंरक्षक व सहायक वनसंरक्षक यांचे उपस्थितीत कार्यशाळा आयोजीत करण्यात येईल व तद्नंतर मा.प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) महाराष्ट्र राज्य यांचे मार्फत तसा अहवाल शासनास सादर करण्यात येईल. समितीचा अहवाल सादर होईपर्यन्त पात्र सध्याचे तरतूदींचे आधारेच अंमलबजावणी करावी.

**(रंगनाथ नाईकडे)**
**मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक)**
**नागपूर**

प्रति
अभ्यास गटातील अध्यक्ष, सहअध्यक्ष, सदस्यसचिव व
इतर सर्व सदस्य

प्रतिलिपी माहिती व पूढील कार्यवाहीस-
१) उपवनसंरक्षक नागपूर / वर्धा / भंडारा व गोंदिया वनविभाग.
२) विभागीय वन अधिकारी (दक्षता) नागपूर.
३) वन परिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) तथा वृक्ष अधिकारी सर्व
३) वनपरिक्षेत्र अधिकारी, फिरते पथक सर्व.
४) महसूल कक्ष, निर्देशन कार्यालय नागपूर.